**ठळक बातम्या**

- देशाला २०२९ पर्यंत नशामुक्त करण्याचा आराखडा केंद्रीय गृहमंत्र्यांकडून सादर
- सर्व पूर्व परीक्षा संगणकाच्या माध्यमातून घेण्याचा MPSC चा निर्णय
- अयोध्येतल्या राम मंदिराच्या देणग्यांमध्ये झालेल्या घोटाळ्याप्रकरणी ८ जणांना पोलीस कोठडी, ७९ लाख रुपये जप्त
- व्हेनेझुएलात झालेल्या भूकंपातल्या मृतांची संख्या ५८९ वर, ३ हजारांहून अधिक नागरिक जखमी

**आणि**

- आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-ट्वेंटी सामन्यात भारतासमोर १८३ धावांचे आव्हान

**<><><><><>**

भारताला २०२९पर्यंत नशामुक्त करण्याचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठीचा सविस्तर कृती आराखडा आज केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज मांडला. ते आज नवी दिल्लीत नार्को कोऑर्डिनेशन सेंटरच्या दहाव्या बैठकीला संबोधित करत होते. गृहमंत्र्यांनी विविध संबंधित घटकांशी सखोल चर्चा करून तयार केलेला अंमली पदार्थ नियंत्रण दृष्टीकोन दस्तऐवज २०२६-२०२९चं अनावरणही केलं. या दस्तऐवजाविषयी शहा म्हणाले....

**होल्ड बाईट - अमित शहा**

अंमली पदार्थांचा विळखा हा राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक स्थैर्य, आर्थिक हितसंबंध आणि तरुण पिढी तसंच देशाच्या भविष्यासाठी धोकादायक असल्याचंही शहा यांनी यावेळी नमूद केलं. गेल्या १२ वर्षांत १ कोटी १८ लाख किलो ग्रॅम अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. ही आकडेवारी अंमली पदार्थाच्या तस्करीविरुद्ध

सरकारची मोहीम सातत्याने प्रगती करत असल्याचं दर्शवत आहे, असं शहा यावेळी म्हणाले. अंमली पदार्थांच्या व्यसनाचं आव्हान साऱ्या जगाला भेडसावत असून या समस्येविरुद्ध एकत्रित लढा देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. गृहमंत्र्यांनी या बैठकीत 'अंमली पदार्थ विल्हेवाट पंधरवडा' उपक्रमाचाही प्रारंभ केला. याअंतर्गत जप्त केलेल्या दोन लाख नऊ हजार पाचशे किलोग्रॅमहून अधिक अमली पदार्थांची विल्हेवाट लावली जाणार आहे.

**<><><><><>**

MPSC अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं सर्व आगामी पूर्व परीक्षा वर्षातून किमान २ वेळा, संगणकाधारित पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. गट क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची २हजार ६१९ पदांसाठीची जाहिरात काल प्रसिद्ध झाली असून ही परीक्षा संगणक प्रणालीवर आधारित असेल असंही आयोगाने म्हटलं आहे. मुख्य अंतिम परीक्षा मात्र जुन्या पद्धतीने  म्हणजे ऑफ लाईन होणार आहे.

पूर्व परीक्षांचे निकाल २१ दिवसांत जाहीर करण्याचे नियोजन आयोगानं केले आहे. नुकताच जाहीर झालेला राज्यसेवा पूर्व परीक्षेचा निकाल अवघ्या २२ दिवसांत प्रसिद्ध करण्यात आला असून, यापुढे सर्व पूर्व परीक्षांचे निकाल २१ दिवसांच्या आत जाहीर करण्याचा प्रयत्न राहील, अशी माहिती आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी दिली. मुलाखत असलेल्या पदांची निवड प्रक्रिया ९ ते ११ महिन्यांत, तर केवळ लेखी परीक्षा असलेल्या पदांची प्रक्रिया ६ ते ७ महिन्यांत पूर्ण केली जाईल, असंही ते म्हणाले.

**होल्ड - भीमनवार बाइट**

तसंच लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अनेक विद्यार्थी उत्तीर्ण होतात, सर्वांना सरकारी नोकरी मिळत नाही. अशा विद्यार्थ्यांना आता त्यांच्या क्षमतांनुसार खाजगी औद्योगिक कंपन्यांमध्ये नोकरी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी उद्योग विभागाशी संपर्क करण्यात आला असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**<><><><><>**

अयोध्येतल्या राम मंदिराच्या देणग्यांमध्ये झालेल्या घोटाळ्याप्रकरणात अटकेत असलेल्या ८ जणांना स्थानिक न्यायालयानं सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यातले ५-६ जण बँकेचे कर्मचारी होते. त्यांच्यावर देणग्यांची रक्कम मोजण्याची जबाबदारी होती. पोलिस कोठडी संपल्यावर त्यांना विशेष न्यायालयात हजर केलं जाईल, असं चौकशी अधिकाऱ्यांनी सांगितलं. याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत ७९ लाख ८५ हजार रुपये जप्त केले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, याप्रकरणी एफ आय आर दाखल झाल्यानंतर राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त अनिल मिश्रा यांनी आपापल्या पदांचा राजीनामा दिला आहे.

दरम्यान, या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याची आणि 'श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट' बरखास्त करून त्याची पुनर्रचना करण्याची मागणी आज काँग्रेसने केली. सर्वोच्च न्यायालयात कार्यरत न्यायमूर्तींच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र चौकशीतूनच या मंदिर लुटीचे खरे स्वरूप समोर येईल, असं काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाळ म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात गडचिरोली जिल्ह्यातल्या शासकीय आश्रमशाळांमधल्या ९६ आदिवासी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. "मोठी स्वप्नं पाहा आणि शिक्षणाच्या बळावर ती पूर्ण करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करा," असा प्रेरणादायी संदेश देत मुर्मू यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. या संवादानंतर

विद्यार्थ्यांना राष्ट्रपती भवनातल्या विविध ऐतिहासिक दालनांची तसंच भव्य वास्तूंची विशेष सफर घडवण्यात आली.

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेंतर्गत गडचिरोली, अहेरी आणि भामरागड इथल्या शासकीय आश्रमशाळांमधले हे विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी दिल्लीला गेले आहेत.

**<><><><><>**

कोलकात्यातल्या तरतला इथल्या निर्माणाधीन गोदामाच्या दुर्घटनेत ठार झालेल्या बांधकाम कर्मचाऱ्यांची संख्या आता १५ वर पोचली असून जखमी कर्मचाऱ्यांवर अद्याप उपचार सुरु आहेत. या गोदामाच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी सुरु असलेली बचाव मोहीम अद्याप सुरु आहे. या दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनी एका सरकारी अधिकाऱ्यासह ६ जणांना अटक केली असून याबाबत अधिक तपास करण्यासाठी राज्य सरकारनं विशेष तपास पथकाची नियुक्ती केली आहे.

**<><><><><>**

व्हेनेझुएला मध्ये झालेल्या दोन शक्तिशाली भूकंपामुळं ठार झालेल्या नागरिकांची संख्या ५८९ वर पोचली असून जखमी झालेल्या नागरिकांची संख्या सुमारे ३ हजार इतकी आहे. भूकंपानंतर तात्काळ सुरु करण्यात आलेली बचाव मोहीम अद्याप सुरु असून ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेतला जात आहे.

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज ऑपरेशन अमिस्तादची घोषणा केली. या मोहिमेअंतर्गत, व्हेनेझुएलाच्या भूकंपानंतरच्या मदतकार्यात सहकार्य करण्यासाठी तातडीची मदत घेऊन भारतीय वायुसेनेची दोन 'सीसी-१७' विमाने आज व्हेनेझुएलाकडे रवाना झाली. यात भारतीय लष्कराचे फील्ड हॉस्पिटल युनिट'

आणि ३५ टनांहून अधिक मदत साहित्य, औषधे आणि वैद्यकीय उपकरणांचा समावेश आहे.

**<><><><><>**

दोन्ही देशांच्या लष्कराच्या प्रतिनिधींचा समावेश असलेला वाद कमी करणारं शिष्टमंडळ स्थापन करण्याचा निर्णय अमेरिका आणि इराणनं घेतला आहे. इराणचं रिव्होल्युशनरी गार्ड आणि अमेरिकन लष्कराच्या सेंट्रल कमांडचे या पथकातले अधिकारी कतारमध्ये असतील, अशी माहिती अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी व्हान्स यांनी दिली आहे.

दरम्यान, एव्हरग्रीन मरीन या तैवानच्या जहाजावर होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडताना हल्ला झाला. अमेरिकेने त्यासाठी इराणला जबाबदार धरलं आहे. फारसं नुकसान न होता हे जहाज सुखरूप बाहेर पडलं. तरी सुरक्षा स्थितीचा अंदाज येईपर्यंत जहाजांना सोबत करण्याची मोहीम संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेनं स्थगित केली आहे.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक पुटबॉल स्पर्धेत आज रात्री उशिरा गट १ मधे नॉर्वे आणि फ्रान्स यांचा सामना होणार आहे. याच गटात इराक आणि सेनेगल यांचाही सामना होणार आहे. हे दोन्ही सामने भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री साडे बारा वाजता सुरु होतील.

दरम्यान, इक्वाडोर, आयव्हरी कोस्ट, नेदर्रलँड, आणि तुर्किये यांनी या स्पर्धेत आपापले सामने जिंकले आहेत.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघाच्या आयर्लंड दौऱ्यात आज बेलफास्ट इथं सुरु असलेल्या पहिल्या टी ट्वेंटी सामन्यात आयर्लंडनं भारतापुढं विजयासाठी १८३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. भारतानं नाणेफेक जिंकून आयर्लंडला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. आयर्लंडनं निर्धारित २० षटकात ९ गडी गमावून १८२ धावा केल्या. कर्णधार लॉर्कन टकरच्या ५० आणि गारेथ डेलनीच्या ४९ धावांचा त्यात मोठा वाटा आहे. भारतातर्फे हर्षित राणानं ३, तर अर्षदीप सिंग आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या चौथ्या षटकात २ बाद ४७ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

जर्मनीत आयोजित ISSF जागतिक कनिष्ठ गट नेमबाजी स्पर्धेत भारतानं पदक तालिकेत अग्रस्थान मिळवलं आहे. ७ सुवर्ण, ८ रौप्य, आणि ९ कांस्य अशी एकूण २४ पदकं भारतीय नेमबाजांनी पटकावली.

//<><><><><>//